# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**<u>दिनांक 10/07/2018 रोजी (का.प.क्र.04) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.</u>**

मंगळवार दिनांक 10/07/2018 रोजी (का.प.क्र.04) मा.सभापती श्री.रेणुकादास (राजु) दत्तोपंत वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका कार्यालयातील "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे सकाळी 11:30 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरु झाली. सभेला मा.अतिरिक्त आयुक्त, श्री.डी.पी.कुलकर्णी, नगर सचिव, श्री.डी.डी.सुर्यवंशी व संबंधित अधिकारी तसेच खालीलप्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01 श्री.गजानन रामकिसन बारवाल
02 श्री.सिध्दांत संजय शिरसाट
03 श्रीमती राखी प्रशांत देसरडा
04 श्रीमती शेख नरगीस सलीम
05 श्री.वाघमारे रूपचंद लक्ष्मण
06 श्रीमती स्वाती किशोर नागरे
07 श्रीमती सत्यभामा दामुअण्णा शिंदे
08 श्रीमती खान सायरा बानो अजमल
09 श्रीमती जयश्री सुरेंद्र कुलकर्णी
10 श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखान
11 श्रीमती शिल्पाराणी सागरअप्पा वाडकर
12 श्री.अब्दुल नविद अब्दुल रशिद

श्री.गजानन बारवाल : दोन दिवसाआड पाणी पुरवठा होईल अशी आपण सुचना केली होती. पावसाळा सुरु होऊन एक महिना झाला.

मा.सभापती : दोन दिवसाआड पाणी पुरवठा टप्या टप्प्याने अंमलबजावणी कधी करणार याचा खुलासा करावा.

कार्यकारी अभियंता(पा.पू.) : दोन दिवसाआड पाणी पुरवठा करण्याचा जो मुद्दा आहे, तर त्या प्रमाणे त्याची चाचणी आम्ही केलेली आहे. 60 टक्के शहरात पाणी पुरवठा करु शकतो. हर्सुलचा जो पाणी पुरवठा आहे तेथे 6 MLD पाणी केले ते पाणी हर्सुलवरुन देत होतो.

श्री.गजानन बारवाल : शहरातील इतर भागाचा पाणी पूरवठा दोन दिवसाआड करु शकतो.

कार्यकारी अभियंता(पा.पू.): प्लॅन केला आहे, पण शेवटच्या ज्या दिल्ली गेट आणि शहागंजची टाक्या आहेत त्या बाबत नियोजन करीत आहे.

मा.सभापती : श्री. बारवाल यांनी सांगितल्या प्रमाणे वेळ न घालता ज्या भागामध्ये तुम्हाला आता शक्य आहे, त्या भागात दोन दिवसाआड पाणी पुरवठा ताबडतोब चालु करावा. आणि इतर उर्वरित भागात पण लवकरात लवकर करता येईल असे प्रयत्न करावे.

श्री.अब्दुल म.नावीद : वार्ड न. 105 मध्ये प्रेशर एकदम कमी असतो आणि ज्या दिवशी प्रेशरने येते ते पाणी वाया जाते. कन्टेमनेशनचे काम आहेत ते होत नाही.

श्री.गजानन बारवाल : पदमपुरा या भागातील कन्टेमनेशनचे काम झाले नाही.पाणी आले की,लिकिजेश वाढते, दूषित पाणी येते.

कार्यकारी अभियंता (पा.पु): जे काही कन्टेमनेशनची कामे आहे त्या कामांना प्राधान्य देऊन ती कामे आम्ही हाती घेतलेली आहे, त्याच्यात बरेचशे ड्रेनेज तुटलेले असतात. त्यामुळे वॉटर सप्लायचा प्रॉब्लेम क्रिएट झालेला आहे. आणि संबंधीत विभागाला आम्ही कळवले परंतु त्यांचा प्रतिसाद देत नाही.

कार्यकारी अभियंता (ड्रे) : कन्टेमिनेशन बद्दल जेव्हा जेव्हा सुचना आलेली आहे तेव्हा संबंधीत वार्ड कार्यालया मार्फत तातडीने काम करण्याचे सांगितलेलेआहे. आणि अजुन काही शिल्लक असेल तर 24 तासाच्या आत आम्ही ते करु.

मा.सभापती : पदमपुरा आणि सादात नगर या दोन्ही वार्डाचे कन्टेमिनेशन काम का होत नाही. तातडीने काम करावे.

श्री.गजानन बारवाल : 2 तारखेला मी महापौर साहेबा सोबत पाहणी केली आणि यापुर्वी सुध्दा चहल साहेबा सोबत मी 3-4 वेळेस पाहणी केली पाहणी केल्यानंतर प्रश्न सुटायला पाहिजे परंतु आतापर्यंत काही झाले नाही.

मा.सभापती : पाणी दुषित होणे हा एवढा सिरीयस विषय आहे, तरी दोन्ही विभागाचे कॉर्डिनेशन होत नाही का. दोन्ही विभागाने काळजी घ्यावी काम करावे ड्रेनेज विभागाने काम करण्यास मदत करावी.

कार्यकारी अभियंता (पा.पू.): आम्ही पत्र पाठवलेले आहे.

मा.सभापती : पत्र दिले आहे, तरी प्रॅाब्लेम काय आहे. दुषित पाणी हे. बंद करावे.सभा संपल्यानंतर दोन्ही अधिकारी यांनी एकत्रित बसून जे काही आवश्यक एजन्सी आहे, ती लावा. 673 (क)चा वापर करावा. परंतु कुठल्याही नागरिकांना दुषित पाणी देता कामा नये ही जबाबदारी आपल्या दोघांवर आहे. याची काळजी घ्यावी.

श्री.अब्दुल नावीद : पाणी वाटप होते याचा सर्वे चालत होते तर त्या बाबत आम्ही कोल्हे साहेबांना चार वेळेस फोन केला तरी त्यांचा रिप्लाय आला नाही आम्ही स्वत: सर्वे करुन पूर्ण वार्डामध्ये कन्टेमनेशनचा प्रश्न बघतो आहे. कुठे पाणी येते कुठे येत नाही, आम्ही स्वत: सर्वे करुन अधिका-यांना फोन करतो आहे तर कोणी फोन उचलायला तयार नाही.

मा.सभापती : श्री कोल्हे यांनी त्यांच्याकडे पाण्याचा अतिशय महत्वाचा विषय आहे, तर जबाबदारीने काम करावे.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर: अनाधिकृत मालमत्ता नियमित करण्यासाठी जाहीर प्रकटन पेपरमध्ये दिले होते, त्याच्यासाठी एक महिन्याचा अवधी दिलेला आहे, परंतु त्याच्यामध्ये कोण कोणत्या कागद पत्राची पुर्तता करण्यात यावी याची माहिती दिलेली नाही, तर एक महिन्याच्या कालावधीत हे होणार आहे का याचा खुलासा करावा.

उपअभियंता(न.र.) : अनाधिकृतला नियमित करण्यासाठी जाहिर प्रकटन सुरुवातीला जानेवारीत दिले होते. त्यामध्ये आपण 6 महिन्याची मुदत दिली होती आणि आता पुन्हा 1 महिना मुदत दिली आहे. माहिती घेण्यासाठी रिक्षाद्वारे माहिती देत आहोत.

श्रीमती स्वाती नागरे : प्रत्येक वार्डात कॅम्प लावायला पाहिजे रिक्षा घेऊन फिरायला पाहिजे.

उपअभियंता (न.र.) : आम्ही अशी नियुक्ती केली आहे कि, प्रत्येक वार्डामध्ये रिक्षा घेऊन फिरतील आणि पॉम्पलेट वाटतील. बॅनरही घेऊन फिरतील.

मा.सभापती : नागरिकापर्यंत माहिती पोहोचायला पाहिजे पेपरमध्ये जाहीरात दिली तर ते नागरिकांपर्यंत जात नाही. तर यासाठी अनाऊसमेंट केली पाहिजे. कर्मचा-याला सांगितले पाहिजे याचा जर तुम्ही वापर केला तर अनियमितता कमी होऊन नियमितता वाढेल.यासाठी आपल्या विभागाने सक्षमपणे काम करावे अशी सुचना करण्यात येते.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर: आता पासुन जर आपण वसूलीची प्लॅनिंग केली, आणि मायक्रो प्लॅनिंग त्यांना करायला सांगितले होते. ते काय आहे जनतेला माहित व्हावे.

मा.सभापती : वसुलीच्या बाबतीत आपण फक्त मार्च आल्यावर धावपळ करतो आणि एरवी वसुलीवर दुर्लक्ष करतो आणि वसुलीवर दुर्लक्ष केल्यावर या शहराच्या विकासावर परिणाम होतो अनेक नगरसेवकांच्या फाईल थांबल्या होत्या. परंतु आयुक्त साहेबांनी या विकास कामाला गती दिली त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. परंतु पुन्हा या फाईली अकाऊंटमध्ये येणार आहे. निधीचा प्रश्न निर्माण होणार आहे. परंतु वसुलीवर लक्ष देऊन

Micro Planing करुन उद्या परवा पासुन प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली पाहिजे. फक्त मार्चमध्ये वसुली करणे योग्य होणार नाही. वर्षभर वसुली करावी.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर: मागच्या वेळेस जो गजानन नगरचा या जागेच्या R.R कार्डचा विषय होता त्या बाबतीत खुलासा करावा. मनपाचे नाव का लावत नाही.

मालमत्ता अधिकारी : 2 दिवसापूर्वी माझ्याकडे मालमत्ता विभागाचा पदभार दिला आहे,आस्थापना 1-2 असे 3 पदभार माझ्याकडे दिले आहे, माहिती घेऊन या बाबतीत खुलासा घेतो.

श्रीमती स्वाती नागरे : कचरा सफाई कर्मचारी यांचे 4 महिन्यापासुन पगार झालेला नाही. याचा खुलासा करावा.

श्री.गजानन बारवाल : गेल्या चार महिन्यापासुन बचत गट आणि आऊट सोर्सिंग कर्मचा-याची पगार झालेली नाही.तर ठेकेदारांनी त्यांची पेमेंट वेळेवर द्यायला पाहिजे.का देत नाही.

कामगार अधिकारी : आऊट सोर्सिंगच्या बाबत मला फोन आला होता. आणि मी आज त्यांच्याकडुन याची डिटेल्स घेतली आहे,कि किती लोकांचे किती महिन्याचे पगार झाले आहे. परंतु तो जो बचत गटाचा विषय आहे तो माझ्याकडे नाही.

श्री.गजानन बारवाल : प्रत्येक महिन्याला पगार का होत नाही याचे कारण काय आहे.

कामगार अधिकारी : मधल्या काही काळामध्ये थोडा डिले झाला आहे.कर्मचा-यांना पगार वेळेवर देण्यासाठी पाठ पुरावा केला जाईन.

घनकचरा (कक्ष प्रमुख) : बचत गट कर्मचारी वार्डामध्ये काम करतात, त्यांच्या पगाराचा विषय जो प्रलबिंत होता, मी फाईल पाहिली तर वेतन निश्चिती नवीन कायद्यानुसार जो प्रश्न होता तेव्हा त्या फाईल प्रलबिंत होत्या. कामगार विभागातुन आणि माझ्याकडुन सुध्दा हा वेतन निश्चितीचा विषय क्लीयर झालेला आहे. आणि जेवढ्या फाईल आलेल्या आहे ते अकाऊंट विभागात काल पाठवलेले आहे, लवकर पगार होईल.

मा.सभापती : ताबडतोब त्यांचे वेतन देता येईल अशी कार्यवाही करावी.

श्रीमती.शेख नरगीस : काल MIM चे सदस्य पाणी आणि कचरा प्रश्नावर गेट जवळ उपोषणास बसले होते.

मा.सभापती : मा.महापौर यांनी भेट घेतली जो प्रश्न असेल सोडवण्याचा प्रयत्न होईल.

श्री.सिध्दांत शिरसाट : मागच्या वेळेस मी अतिक्रमणचा विषय घेतला होता तर मला परत त्या विषयावर प्रश्न करायचा आहे कि, रेल्वे स्टेशन आणि पेट्रोल पंपाच्या बाबतीत महानगरपालिकेने काय कार्यवाही केली आहे.

श्री.गजानन बारवाल : त्याच भागात RTO च्या भिंतीची जागा असेल भाजी मंडी जागा असेल ते काढण्यात का आले नाही.

मा.सभापती : एखाद्या बैठकीमध्ये जर सदस्यांनी प्रश्न मांडला तर तो पुढच्या बैठकीमध्ये तो विषय मांडायची गरज येऊ नये अशा पध्दतीने काम करणे अपेक्षित आहे.

उपअभियंता(न.र) : ज्या अधिका-याशी चर्चा केली होती त्यांची बदली झाली तिथे दुसरे अधिकारी आले आहे. काल परत महापौर साहेब बोलले त्यांना.आज बोलवलेल आहे महापौर साहेबांनी R.T.O ऑफिसची जी भिंत आहे ते Compound आहे ती जागा द्यावी अशी मागणी करणार आहे.पेट्रोलपंपाची जागा घेणेसाठी भुसंपादन करावे लागले 1.40 कोटीची डिमांड केली आहे.

श्री.सिध्दांत शिरसाट : पेट्रोल पंपची जी जागा भूसंपादन करणार होते, तर त्याचे काय झाले.

उपअभियंता(न.र) : भूसंपादनाचे पत्र पाठविले आहे. 1 कोटी 40 लाख रुपयाची डिमांड केलेली आहे. ती रक्कम देणेकरिता अकाऊंटला पाठवलेले आहे.

मा.सभापती : मा.आयुक्त साहेबाकडे ताबडतोब पाठवून याची मंजुरी घ्यावी आणि ते ॲक्वॉय होईल याची दखल घ्यावी.

श्री.सिध्दांत शिरसाट : माझ्या वार्डात असलेले जेवढे काही अतिक्रमण आहे, ते काढावे. हॉटेल वगैरे मालक कोर्टात गेले. परंतु आपले वकील कोर्टामध्ये क्लर्क वार्डमध्ये तारखेला का जात नाही.

विधी सल्लागार : यामध्ये स्पेशल कौन्सिल लावलेले आहे, आणि आपल्या पॅनलवरचे जेष्ट वकील त्यांनी हे मॅटर आणि याच्या बरोबर जे कनेक्टेड मॅटर आहे, ते सगळे ठेवलेले आहे. प्रत्येक तारखेला आपले वकील असतात. ते मॅटर अटेंड करुन येतात, त्याच्यामध्ये आपला रिप्लाय झालेला आहे.अर्गुमेन्ट झालेला आहे समोरच्या पार्टीचे अर्गुमेन्टमुळे आणि ऑर्डरसाठी मॅटर प्रलंबीत आहे. आपल्या कडुन कोणता डिले झालेला नाही.

मा.सभापती : याच्यामध्ये पर्सनली लक्ष देऊन हे मॅटर लवकरात लवकर संपेल याची काळजी विधी विभागाचे अधिकारी यांनी घ्यावी.

श्री.सिध्दांत शिरसाट : माझ्या वार्डात RTO ऑफिसची जी सुरक्षा भिंत आहे, ती 12 मीटर डिपी रोडमध्ये आलेली आहे. तर ती भिंत हटवायला एवढा वेळ का लागतो आहे.

मा.सभापती : मा.महापौरांनी बैठक बोलवली आहे आपण तेथे यावे मार्ग काढू.

श्री.सिध्दांत शिरसाट : माझ्या वार्डात MTDC ला लागून असलेला एक डिपी रोड आहे. तिथे जे एक अतिक्रमण आहे, तर ते काढण्यात येत नाही. त्याच्यानंतर तेथील जे अतिक्रमण वाले आहे त्यांनी तिथे एक जूनी टपरी काढून नवीन टपरी आणून लावली.

मा.सभापती : तेथे जी टपरी लावलेली आहे त्याच्यावर ताबडतोब कारवाई करण्यात यावी.

पदनिर्देशित अधिकारी : या पूर्वी कारवाई केली होती. आणि मा.न्यायालयात याचे प्रकरण आहे.

मा.सभापती : त्याच्यावर थेटे मॅडमचे ओपीनीयन घ्या. आणि जर स्टे नसेल तर आजच्या आज काढून घ्यावे.

श्रीमती.स्वाती नागरे : 13 महिने होऊन गेली अतिक्रमणाच्या बाबत काहीच कारवाई झालेली नाही.

पदनिर्देशित अधिकारी : भाजीमंडीच्या रस्त्यावरच्या हातगाड्या वारंवार काढलेल्या आहे. आणि या बाबतीत स.सदस्या यांना पत्र सुध्दा पाठवले होते.

मा.सभापती : तुम्ही ते पूर्ण अतिक्रमण काढून तिथे सेक्युरीटी गार्ड ठेवण्यात यावा.आणि थेटे मॅडमला पत्र देऊन या दोन्ही रस्त्यावरचे अतिक्रमण काढुन घ्यावे.माझे वार्डात अतिक्रमण आहे गजानन महाराज मंदीर समोर जे अतिक्रमण आहे ते काढण्यात यावे.

श्रीमती.सायरा बानो : माझ्या वार्डमध्ये 77 अतिक्रमण काढण्याचे पत्र दिले होते, तर त्याच्यातुन एक पण अतिक्रमण काढलेले नाही. माझे घरासमोर दुकानचे अतिक्रमण आहे.

मा.सभापती : 77 अतिक्रमणाचे जे पत्र दिलेले आहे, ते बघा आणि यावर ताबडतोब कारवाई होईल अशी कार्यवाही करावी.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर: कच-याचा विषय आहे, वार्डातले जे सफाई कर्मचारी आहे, त्यांच्याकडुन आपण काम करुन घेतो. आणि वार्डातल्या कर्मचा-याची बदली केली तर ते वार्ड अधिका-याला माहित नाही नगरसेवकाला माहित नाही. बदली केली तेव्हापासुन ते गैरहजर आहे. तर त्याच्या जागी दुसरे कर्मचारी न देता बदली का केली.

मा.सभापती : आस्थापना विभागाचे नोंद घ्यावी कार्यवाही करावी.

श्रीमती.राखी देसरडा : सर्वसाधारण सभा असो किंवा स्थायी समिती असो प्रत्येक नगरसेवक हे होर्डिंग्स बद्दल चर्चा करत असते. तर त्या होर्डिंग्स बद्दल फक्त चर्चाच होत असते त्याच्यावर प्रत्यक्ष कार्यवाही होत नाही. शहराचा जो मध्यवर्ती ठिकाणी जो कब्रस्तान आहे, तिथे ज्या होर्डिंग लावण्यात आलेल्या आहे ते महानगरपालिकेच्या अंतर्गत आहे. परंतु तिथे ज्या होर्डिंग आलेल्या आहे ते संपूर्ण महानगरपालिकेच्या नसुन तिथे ते इतर लोकांनी स्पेशली होर्डिंग्ज लावण्यात आलेल्या आहे. त्या काढाव्या आणि जे स्ट्रीट लाईट पोल रस्त्यावरचे आणि मेन डिवाईडर आहे, तर तिथे एका कंपनीने जे कंन्स्ट्रक्शन घेतलेले आहे, आणि त्या डिवाईडरची व्यवस्थित रंगरंगोटी होत नाही. आणि तिथे जे झाडे लावली त्याचा ते मेंन्टेनेस करणार आहे. त्या झाडाखाली किती तरी लाईन आहे. आणि तिथे जे होर्डिंग लावले जातात त्याच्यामध्ये प्रशासन काही दखल घेत नाही. आणि महानगरपालिकेची क्रांतीचौकला जी टाकी आहे तर ते पण महानगरपालिकेच्या अंतर्गत येते. तिथेही जे

होर्डिंग लावलेली आहे ते महानगरपालिकेचे नाही. आणि उस्मानपुरामध्ये जे मेन सर्कल आहे,तिथेही होर्डिंग आहे. जालना रोडला सुध्दा ज्या होर्डिंग आहे ते सुध्दा अर्ध्या पेक्षा जास्त दुस-या लोकांनी लावलेली आहे. आणि ज्या महानगरपालिकेच्या होर्डिंग आहे आणि जे स्वत:जे प्रायवेट जागावर त्या ज्या होर्डिंग लावलेली आहे, तर या तक्त्यामध्ये बघितले तर ही खुप मोठी तफावत आहे. महानगरपालिकेची अग्नीशामक असेल तर कर कमी आणि खाजगी जागेवर जर असेल तर पेमेंट जास्त तर हे अस का होत. तर याची कारवाई करण्यात यावी.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर: मागच्या मिटिंगमध्ये मला संबंधीत विभागाने माहिती दिली होती कि, जे अधिकृत होर्डीग वर, नंबरिंग केलेली आहे. पण एकाही होर्डिंगवर नंबरिंग नाही, तर हे ओळखणार कसे अधिकृत की अनाधिकृत आहे.

मा.सभापती : मा.आयुक्त आणि जिल्हाधिकारी साहेब यांनी एक बैठक घेतली आहे. आणि एक पॉलिसी डिसाईड केली आहे, जे पण होर्डिंग महापालिकेने परवानगी दिली आहे, अधिकृत होर्डिंग आहे ते होर्डिंग सोडुन जे काही होर्डिंग आहे ते सगळे संबंधित अधिकारी तातडीने कारवाई करणार आहे अशा सुचना दिल्या आहे. त्यांनी जर ते काढले नाही तर, पुढील आठवड्यात महापालिकेच्या वतीने एक स्पेशल माहीती घेऊन सगळे अनाधिकृत होर्डिंग काढण्याचा निर्णय कालच्या बैठकीत जिल्हाधिकारी साहेबाकडे झालेला आहे. याची माहिती मला आयुक्त साहेबांनी दिली आहे.

श्रीमती.शेख नरगीस : वार्डात मोकाट कुत्रे फिरत असतात त्यामुळे मुले शाळेत जाण्यासाठी सुध्दा घाबरतात भितीने बाहेर निघत नाही.नेहरुनगर नगर भागात मोठ्या संख्येने आहे बंदोबस्त का होत नाही.

संचालक (प्राणी संग्रहालय): सध्या 2 पथकाच्या गाड्या आहे. एक सकाळी आणि एक संध्याकाळी चालु आहे. आणि तक्रार आल्यानंतर आर्ध्या तासाच्या आत आमची तिथे गाडी जाते असे नियोजन आम्ही केलेले आहे. आताच सुचना केल्यानुसार त्या वार्डात गाडी पाठवू. सकाळी 6 वाजता गाडी पाठवून देऊ. आम्ही कुत्रे तिथून पकडतो आहे. आणि लसीकरण करुन तिथेच सोडतो आहे. दुस-या गल्लीत सोडू शकत नाही. त्यांना मारु पण शकत नाही. गल्लीत जेवढे कुत्रे आहे तेवढेच राहतील. 2 गाड्या आहे. आणि आणखी 2 आम्ही चालु करत आहोत.

मा.सभापती : संपूर्ण शहरामध्ये जर दोनच गाड्या आहे. आणि कुत्र्याची संख्या दिवसेंदिवस वाढतच चाललेली आहे. तर याच्यावर उपाय काय आहे.

संचालक(प्राणी संग्रहालय): मागच्या बैठकीत बारवाल साहेबांनी आदेश दिले होते आणखी दोन गाड्या देण्याचे नियोजन केले होते. आणि यांत्रिकही विभागाने ती कार्यवाही केलेली आहे. खरेदीची फाईल अकाऊंट कडे पडून आहे.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर: कुत्रे पकडणारी लोक वयोवृध्द आहे ते पकडू शकत नाही.

मा.सभापती : साळुंके साहेब बघतील त्याची फाईल क्लियेर करतील. परंतु आता जे काही तुमच्याकडे Available आहे ते ताबडतोब ठरवून घ्या तारीख ठरवून घ्या. प्रत्येक वार्डात कुत्रे आहे. तर प्रत्येक वार्डात तुमची गाडी गेली पाहिजे. ही तुमची जबाबदारी आहे. नेहरुनगर भागात गाडी पाठवावी.

श्रीमती.सत्यभामा शिंदे : कुत्रे पकडून नेतात आणि परत तिथेच सोडून देतात. नसबंदी सुध्दा केली जात नाही. कुत्रे पकडुन नेणे आणि परत तिथेच सोडुन देणे हा जो कुत्र्यावरती आणि कच-यावरती जो खर्च होतो आहे तो कितपत योग्य आहे हा निर्णय सभागृहाने घेतल्या शिवाय कुत्र्याचा आणि कच-याची ही समस्या सुटु शकणार नाही. मागच्या पंचवार्षिक मध्ये 24 कोटीचे जे रस्ते केले होते त्यावरती आता 1 महिन्यापूर्वी जे स्पीडब्रेकर लावले होते. तर ते आठ दिवसानंतर निघुन गेले. तर ते स्पीडब्रेकर योग्य रित्या लावण्यात यावे. B.N.2

ठाकरेनगर मध्ये 5-6 घरांना वर्षापासुन पाणी येत नाही. त्यांची सारखी तक्रार येत असते आणि खड्डे करुन ठेवतात. त्या खड्याला 6-6 महिने कोणी काम करण्यास येत नाही.

मा.सभापती : हे जे मुद्दे आहे ते नोट करुन घ्या जे खड्डे केले आहे ते काम संपल्यानंतर कंत्राटदाराला सांगुन हे काम करुन घ्या. असे सांगितले.

श्री.गजानन बारवाल : इंदौर दौरा केला कच-यावर योग्य तो निर्णय घेऊन चांगला परिणाम दिसायला पाहिजे होता. स्वच्छता होण्यासाठी विशेष लक्ष द्यावे.

श्री. गजानन बारवाल : समांतर बाबत चर्चा करावी.

मा.सभापती : हा विषय सर्वसाधारण सभेशी निगडीत आहे. आणि सर्वसाधारण सभेत याची चर्चा केल्याशिवाय या बाबत काही निर्णय घेणार नाही.असे सांगितले.

श्रीमती.सायरा बानो : MIM चे 26 कार्पोरेटर पाणी आणि कचरा संदर्भात उपोषणास बसले होते.

मा.सभापती : याची सुचना मिळाली होती. मा.महापौर व मी स्वतः भेट घेतली.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर: फायर ब्रिगेडचा जो अहवाल आहे त्याच्यामध्ये 56 प्रकरण आहेत. तर ते अहवालानुसार अंतिम N.O.C च्या त्रुटीची पुर्तता केली कि नाही हे न तपासता करणे हे गंभीर आहे.आणि या सर्व इमारती 56 आहे. तर हे वरदळीच्या ठिकाणच्या आहे. तर काही अनुचित प्रकार घडला तर याचा जबाबदार कोण राहणार आहे. तर याच्यामध्ये एक एजन्सी आहे फायर गार्ड फायर औरंगाबाद या एजन्सीचा कालावधी संपला असतांना आणि त्या एजन्सीने लायसन्स रिनिवल केले नसतांना सुध्दा त्यांनी फायर NOC दिलेले आहे. हे कितपत योग्य आहे. कारण याच्यामध्ये अग्नीशामक विभागाने अंतीम N.O.C देतांनाची एजन्सीची वैधता तपासली नव्हती का. आणि ते लायसन्स रिनिवल केलेले नसतांना सुध्दा त्यांनी फायर NOC दिलेली आहे. यामध्ये काही ठिकाणी त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केलेली नाही. फायनल N.O.C देण्यापूर्वी प्रत्यक्ष पाहणी करुन राहिलेल्या त्रुटी पूर्ण न करता त्यांनी फायर NOC दिलेली आहे. आणि अग्नीशामक विभागाने आणि एजन्सीने सगळ्या नियमाचे उल्लंघन या ठिकाणी केलेले आहे. महाराष्ट्रात प्रतिबंधक नियम 2006 च्या कायद्यानुसार मोठ मोठ्या धारकाने एजन्सीने केलेल्या उपाययोजने संबंधी पार पडलेल्या कामा बाबत आणि फॉर्म A मध्ये प्रमाणपत्र देऊन त्यावर दिनांक नमुद करणे आवश्यक आहे. परंतु त्यामध्ये काही दिनांक टाकुन काही दिलेले नाही. अग्नीशामक विभागात सदरील फॉर्म प्राप्त झाल्यानंतर त्या फॉर्मवर नंबर सुध्दा नोंदवलेला नाही. आणि एखाद्या बिल्डिंगची पाहणी करुन त्याचा रिपोर्ट अग्नीशामक विभागाला देणे आवश्यक आहे. आणि नंतर त्या रिपोर्ट नुसार पाहणी करुन उपाययोजना तपासून मगच N.O.C. ही जाते. पण काही इमारतीच्या बाबतीत चौकशी न करता NOC दिलेले आहे. हा अत्यंत गंभीर प्रकार आहे. काही ठिकाणी एकाच इमारतीला 2-2 फायर N.O.C दिलेली आहे. स्थायी समितीने एक ठराव घेतला दरवाढीची मंजुरी देण्यात आली होती. 10 हजाराची फि आकारण्यात येत होती. परंतु त्यांनी 5 हजार रुपये फि घेतलेली आहे. नियमाचे उल्लंघन त्यांनी केलेले आहे आणि महापालिकेचे आर्थिक नुकसान त्यांनी केलेले आहे. तर त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात यावी.

श्रीमती.शेख नरगीस : एजन्सी NOC दिलेली नसते तर ती N.O.C दिलेली आहे तर ही रद्द होईल का.

मा.सभापती : या विभागाचे प्रमुख यांनी याचा खुलासा करावा.

श्री.गजानन बारवाल : 56 त्रुट्या आहे NOC दिली काही ठिकाणी 2 NOC दिली त्रुट्या आहेत त्यांची गांभीर्याने दखल घ्यावी.

अग्नीशमन अधिकारी : आम्ही महाराष्ट्र शासनाचे अग्निशामक विभागाचे संचालक यांचे पत्र आहे त्यानुसार आम्ही NOC देत असतो . यामध्ये 1 फॉर्म हे ज्या बिल्डिंगला काम पूर्ण, झाले आहे त्या एजन्सीने केले असतील तर हे फॉर्म घेतला जातो. आणि जे फायर टॅक्स एजन्सी आहे ते शासनाने अजुन रद्द केलेली नाही. ती एजन्सी त्यांच्या पॅनलवर आहेत.

श्री.गजानन बारवाल : जाणीव पूर्वक मोठ्या त्रुट्या निर्माण करीत आहे, पूर्तता करायला पाहीजे. गंभीर दखल घ्यावी.

अग्नीशमन अधिकारी : कलेक्टर जे तोंडी आदेश किंवा पत्र देतात त्यानुसार आम्ही बाहेरची NOC ते करतो.

मा.सभापती : हे जे 56 ऑडिट आलेले आहे. त्यांच्या बाबतीत तुमचे काय मत आहे.

अग्नीशमन अधिकारी : माझे यावर अभिप्राय, मत घेतलेले नाही.

मा.सभापती : अग्नीशामक अधिकारी याचा खुलासा का घेतला नाही.

मुख्य लेखा परीक्षक : हा अहवाल मी 2 महिन्यापूर्वी इशू केला होता. आणि जेव्हा Asper प्रोसिजर odit होत असतांनाच आपण अर्धसेवा समास पत्रे का दिलेली आहे.परिच्छेद प्रत्येक दिलेले आहे. त्याचे उत्तर आले नाही, म्हणून असे आक्षेप आपण घेतलेले आहे. महापौरांना याचा अहवाल देण्याचे सांगितले होते.

मा.सभापती : तुम्ही जर अहवाल दिला असेल तर तुमच्याकडे नोंद असेल .

मुख्य लेखा परीक्षक : हे जे चौकशी अहवाल आहे तर हे मा.महापौर यांना सांगितले होते त्या अनुषंगाने घेतलेले आहे. अग्नीशामक विभागात गेले होते,तपासणी केली होती.

मा.सभापती : हा रिपोर्ट अग्नीशामक अधिकारी यांच्याकडे द्या आणि याचा खुलासा घ्या. खुलासा घेतल्यानंतर हे रिपोर्ट आमच्याकडे द्या. आणि खुलासा न घेता त्यांच्यावर काही कार्यवाही करणे योग्य नाही.10-15 दिवसामध्ये त्यांचे काय म्हणणे आहे या 56 मुद्यांच्या बाबतीत याचा लेखी स्वरुपात सादर करावे. फाईनल झाल्यानंतर समितीकडे सबमीट करावे. पूर्ण यादीच्या बाबतीत त्यांना एक कॉपी द्या आणि लेखी खुलासा घ्यावा.

**विषय क्र. 19 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.103, वेदांतनगर अंतर्गत भागीरथी येथील रस्त्याचे कॉंक्रीटींग करणेच्या कामाचे अंदाजपत्रक राज्य दरसुची (SSR) सन 2017-2018 नुसार रक्कम रू.39,66,100/- चे तयार करण्यात आलेले आहे. प्रस्तावित कामाकरीता अर्थसंकल्प सन 2017-18 या वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पात भांडवली खर्च-अ- अंदाजपत्रक मा.महापौर यांनी सुचविलेली अत्यावश्यक कामे या लेखाशिर्ष अंतर्गत मा.महापौर यांचे पत्र-जा.क्र./मनपा/महापौर/542/2018 दि.13/03/2018 नुसार तरतुद उपलब्ध आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त असून मा.स्थायी समिती सभे समोर प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करणेबाबत शिफारस आहे.

करीता, प्रस्तावीत कामाच्या र.रू.39,66,100/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय क्रमांक 19 मंजुर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.103, वेदांतनगर अंतर्गत भागीरथी येथील रस्त्याचे कॉंक्रीटींग करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.39,66,100/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 20 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.103, अंतर्गत कामगार चौक ते गाडे चौकापर्यंतच्या मुख्य रस्त्याचे कॉंक्रीटींग करणेच्या कामाचे अंदाजपत्रक राज्य दरसुची (SSR) सन 2017-2018 नुसार रक्कम रू.34,96,108/- चे तयार करण्यात आलेले आहे. प्रस्तावित कामाकरीता अर्थसंकल्प सन 2017-18 या वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पात भांडवली खर्च-अ- अंदाजपत्रक मा.महापौर यांनी सुचविलेली अत्यावश्यक कामे या लेखाशिर्ष अंतर्गत मा.महापौर यांचे पत्र-जा.क्र./मनपा/महापौर/545/2018 दि.13/03/2018 नुसार तरतुद उपलब्ध आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त असून मा.स्थायी समिती सभे समोर प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करणेबाबत शिफारस आहे.

करीता, प्रस्तावीत कामाच्या र.रू.34,96,108/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.103, अंतर्गत कामगार चौक ते गाडे चौकापर्यंतच्या मुख्य रस्त्याचे काँक्रीटींग करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.34,96,108/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 21 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कार्यालयीन आदेश जा.क्र./मनपा/आस्था-1/2017/1182, दि.08/09/2017 अन्वये खालील कर्मचाऱ्यांना दि.22/01/2016 पासून दैनिक वेतनावर सामावून घेण्यात आलेले आहे. तसेच मा.वॉर्ड अधिकारी यांनी संबंधीतांना दि.03/11/2017 पासून मुदतवाढ देणे बाबत संचिकेमध्ये अभिप्राय दिले आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव (सर्वश्री/श्रीमती) | पदनाम | कार्यरत विभाग | ठराविक/दैनिक वेतन |
|---|---|---|---|---|
| 01. | सुरेश कैलास काळे | सफाई मजूर | प्रभाग क्र.8 | रू.424/- |
| 02. | प्रकाश श्रीरंग चितळकर | सफाई मजूर | प्रभाग क्र.8 | रू.424/- |
| 03. | बाबासाहेब कारभारी सोनवणे | सफाई मजूर | प्रभाग क्र.8 | रू.424/- |
| 04. | भास्कर दादाभाऊ जाधव | सफाई मजूर | प्रभाग क्र.8 | रू.424/- |
| 05. | शेख सिराज शेख रसुल | पाणी पुरवठा मजूर | प्रभाग क्र.8 | रू.424/- |
| 06. | राहुल दादाराव शिनगारे | मजूर (आवक जावक विभाग) | प्रभाग क्र.8 | रू.424/- |
| 07. | नरेंद्र ओमप्रकाश घुसर | सफाई मजूर (ड्रेनेज) | प्रभाग क्र.8 | रू.424/- |
| 08. | रामभाऊ शंकर मामडे | स्मशानभुमी रक्षक | प्रभाग क्र.8 | रू.424/- |

उपरोक्त प्रमाणे एकूण (08) दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना दोन दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि.03/11/2017 ते 30/04/2018 पर्यंत 06 (सहा) महिन्याची मुदतवाढ देऊन त्यानंतर दोन दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.03/05/2018 ते 31/10/2018 पर्यंत 06 (सहा) महिन्याची मुदतवाढ देण्यासाठीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कार्यालयीन आदेश जा.क्र./मनपा/आस्था-1/2017/1182, दि.08/09/2017 अन्वये प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र.01 ते 08 (एकूण 08 कर्मचारी) कर्मचाऱ्यांना दि.22/01/2016 पासून दैनिक वेतनावर सामावून घेण्यात आलेले असल्यामुळे, तसेच वॉर्ड अधिकारी यांनी संबंधीतांना दि.03/11/2017 पासून मुदतवाढ देणे बाबत संचिकेमध्ये अभिप्राय दिले असल्याने उपरोक्त प्रमाणे एकूण (08) दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना दोन दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि.03/11/2017 ते 30/04/2018 पर्यंत 06 (सहा) महिन्याची मुदतवाढ देऊन त्यानंतर दोन दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.03/05/2018 ते 31/10/2018 पर्यंत 06 (सहा) महिन्याची मुदतवाढ देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 22 :**

विषय : औरंगाबाद पाणी पुरवठा योजना-नक्षत्रवाडी पंपगृह ते शहरापर्यंत असलेल्या 1400 मीमी व 1200 मीमी व्यासांच्या गुरूत्व वाहिन्यांची तसेच शहराअंतर्गत 500 मीमी व्यासापर्यंत असलेल्या मुख्य फिडर मेन्सची व अनुषंगीक उपांगाची वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे.

संदर्भ : Tender ID 2017-AMCA-169719-5

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता - (पाणी पुरवठा) |
| 2. | कामाचे स्वरुप/ कामाचे नांव | औरंगाबाद पाणी पुरवठा योजना-नक्षत्रवाडी पंपगृह ते शहरापर्यंत असलेल्या 1400 मीमी व 1200 मीमी व्यासांच्या गुरूत्व वाहिन्यांची तसेच शहराअंतर्गत 500 मीमी व्यासापर्यंत असलेल्या मुख्य फिडर मेन्सची व अनुषंगीक उपांगाची वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | मा.स्थायी समिति सभा दि.11/11/2016 (दि.26/10/2016 रोजीची तहकुब सभा का.प.क्र.-07) विषय क्र.55 नुसार पुर्वगणकपत्रक र.रू.44,44,100/- मान्य झाले आहे. |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | रूपये 42,32,424/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | "ई निविदा मार्फत" |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | 03/03/2018 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 22/03/2018 |
| 6. | निविदा किती वेळेस मागविल्या? | पाच वेळेस |
| 7. | एकूण किती निविदा आल्या? | एक |
| 8. | निविदा प्राप्त दर | निविदा दरापेक्षा 18% जास्त दराने |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | भरलेले दर | पुर्वगणक पत्रकापेक्षा टक्केवारी जास्त | Bid Rank |
|---|---|---|---|---|---|
| 1 | नुर कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद | 42,32,424.39/- | 49,94,260.78/- | 18% जास्त दर | L-1 |

| | | |
|---|---|---|
| 9. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? असल्यास कारणे नमुद करावीत. | होय, अंदाजपत्रक मजिप्राच्या दरसुची सन 2015-16 नुसार असणे, इ. मुळे प्राप्त 18% जास्त दराच्या निविदेचे सन 2016-17 प्रमाणे दर घेऊन तुलनात्मक विवरण तयार केले असता, वाटाघाटी व सक्षम मंजूरी अंती कार्यवाही करून 14.86% जास्त दराच्या निविदेची शिफारस करण्यात आली. |
| 10. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | सन 2016-17 AOSG मधुन |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 11. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | लागू नाही. |
| 12. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषपत्राचा नमुना जोडला आहे काय? | होय |

तरी विषयाकिंत काम ठेकेदार नुर कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांचेकडून वाटाघाटीअंती मान्यतेनुसार निविदा रक्कम रूपये 42,32,424.39/- पेक्षा 14.86% जास्त दराने म्हणजेच र.रूपये 48,61,469/- पर्यंत करून घेण्यास व करार करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

श्री.गजानन बारवाल : अनेक निविदा प्रलंबीत आहे. 5-6 वेळेस निवीदा काढल्या, कोणीही भरत नाही. अशा किती निवीदा आहे तेच ते ठेकेदार निवीदा भरतात.

मा.सभापती : प्रशासनाने एकदा त्या कंत्राटदारांची बैठक घ्या आणि त्यांच्या काय तक्रारी आहे ते समजुन घ्या. त्यांच्या काय अडचणी आहे, ते आम्हाला सांगा आम्ही पण त्यांना मदत करु.

श्री.सिध्दांत शिरसाट : असे वाटाघाटीसाठी भरपूर फाईल आहे तर लवकरात लवकर मार्गी लावण्यात यावी.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येत आहे. अशा संचिका लवकर मार्गी लावण्यात याव्या.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणी पुरवठा योजना-नक्षत्रवाडी पंपगृह ते शहरापर्यंत असलेल्या 1400 मीमी व 1200 मीमी व्यासांच्या गुरूत्व वाहिन्यांची तसेच शहराअंतर्गत 500 मीमी व्यासापर्यंत असलेल्या मुख्य फिडर मेन्सची व अनुषंगीक उपांगाची वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदर काम ठेकेदार नुर कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांचेकडून निविदा र.रूपये 42,32,424.39/- पेक्षा 14.86% जास्त दराने म्हणजेच र.रूपये 48,61,469/- पर्यंत करून घेण्यास व करार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 23 :**

विषय : औरंगाबाद पाणी पुरवठा योजना-फारोळा जलशुध्दीकरण केंद्र ते नक्षत्रवाडी पंपगृह दरम्यान असलेल्या 700 मीमी व 1219 मीमी व्यासांच्या शुध्द उध्दरण वाहिन्यांची व अनुषंगीक उपांगाची वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे.

संदर्भ : Tender ID 2017-AMCA-169725-5

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता - (पाणी पुरवठा) |
| 2. | कामाचे स्वरुप/ कामाचे नांव | औरंगाबाद पाणी पुरवठा योजना-फारोळा जलशुध्दीकरण केंद्र ते नक्षत्रवाडी पंपगृह दरम्यान असलेल्या 700 मीमी व 1219 मीमी व्यासांच्या शुध्द उध्दरण वाहिन्यांची व अनुषंगीक उपांगाची वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | मा.स्थायी समिती सभा दि.11/11/2016 (दि.26/10/2016 रोजीची तहकुब सभा का.प.क्र.-07) विषय क्र.54 नुसार पुर्वगणकपत्रक र.रू.45,54,400/- मान्य झाले आहे. |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | रूपये 43,37,512.65/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | "ई निविदा मार्फत" |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | 03/03/2018 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 22/03/2018 |
| 6. | निविदा किती वेळेस मागविल्या? | पाच वेळेस |
| 7. | एकूण किती निविदा आल्या? | एक |
| 8. | निविदा प्राप्त दर | निविदा दरापेक्षा 18.50% जास्त दराने |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | भरलेले दर | पुर्वगणक पत्रकापेक्षा टक्केवारी जास्त | Bid Rank |
|---|---|---|---|---|---|
| 1 | नुर कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद | 43,37,512.65/- | 51,39,952.49 | 18.50% जास्त दर | L-1 |

| | | |
|---|---|---|
| 9. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? असल्यास कारणे नमुद करावीत. | होय, अंदाजपत्रक मजिप्राच्या दरसुची सन 2015-16 नुसार असणे, इ. मुळे प्राप्त 18.50% जास्त दराच्या निविदेचे सन 2016-17 प्रमाणे दर घेऊन तुलनात्मक विवरण तयार केले असता, वाटाघाटी व सक्षम मंजूरीअंती कार्यवाही करून 15.32% जास्त दराच्या निविदेची शिफारस करण्यात आली. |
| 10. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | सन 2016-17 AOSG मधुन |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 11. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | लागू नाही. |
| 12. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषपत्राचा नमुना जोडला आहे काय? | होय |

तरी विषयाकिंत काम ठेकेदार नुर कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांचेकडून वाटाघाटीअंती मान्यतेनुसार निविदा रक्कम रूपये 43,37,512.65/- पेक्षा 15.32% जास्त दराने म्हणजेच र.रूपये 50,02,144/- पर्यंत करून घेण्यास व करार करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणी पुरवठा योजना-फारोळा जलशुध्दीकरण केंद्र ते नक्षत्रवाडी पंपगृह दरम्यान असलेल्या 700 मीमी व 1219 मीमी व्यासांच्या शुध्द उध्दरण वाहिन्यांची व अनुषंगीक उपांगाची वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारकाशी वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदर काम ठेकेदार नुर कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांचेकडून निविदा रक्कम रूपये 43,37,512.65/- पेक्षा 15.32% जास्त दराने म्हणजेच र.रूपये 50,02,144/- पर्यंत करून घेण्यास व करार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>ऐनवेळचे विषय</u>

**विषय क्र. 24 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.98 उल्कानगरी अंतर्गत श्रीनगर येथे रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन 2015-2016 नुसार रक्कम रूपये 29,98,550/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास दि.14/11/2017 अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यांत आलेली आहे.

सदर कामासाठी लागणारा खर्च मनपा अर्थसंकल्प 2017-2018 लेखाशिर्ष नविन कॉंक्रीट रस्ते शहर, एस.सी.आर.-वार्ड-07, पृष्ठ क्र.57, अ.क्र.01 रक्कम रू.30.00 लक्ष तरतुद उपलब्ध आहे. करिता सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रूपये 29,98,550/- मंजुरीबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.98 उल्कानगरी अंतर्गत श्रीनगर येथे रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रूपये 29,98,550/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 25 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.96 मेहेरनगर-गारखेडा येथील मंजूर रेखाकंनातील अंतर्गत खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे व जॉगिंग ट्रॅक तयार करणे, या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन 2015-2016 नुसार रक्कम रूपये 37,25,750/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास दि.26/02/2018 अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यांत आलेली आहे.

सदर कामासाठी लागणारा खर्च मनपा अर्थसंकल्प 2017-2018 लेखाशिर्ष विकास योजने अंतर्गत भुखंड सरंक्षण,वार्ड-07,ए.बी.एस.पृष्ठ क्र.03,अ.क्र.09 र.रू.50.00 लक्ष तरतुद उपलब्ध आहे. करिता सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रू.37,25,750/- मंजुरीबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.96 मेहेरनगर-गारखेडा येथील मंजूर रेखाकंनातील अंतर्गत खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे व जॉगिंग ट्रॅक तयार करणे, या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रूपये 37,25,750/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 26 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.87 सदाशिवनगर येथील गणपती मंदिर व पी-3 मधील श्री.हनुमान मंदिर समोरील खुली जागा विकसीत करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग सन 2015-16 च्या दरसुचीनुसार र.रू.29,98,872/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून या कामाचा खर्च सन 2017-18 च्याअर्थसंकल्पातील विकास योजने अंतर्गत भुखंडाचे संरक्षण या लेखाशिर्षक मधुन करण्यांत येईल.

करिता अंदाजपत्रक रक्कम रूपये 29,98,872/- चा अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय क्रमांक 26 ते 36 हे अंदाजपत्रक आहे, मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.87 सदाशिवनगर येथील गणपती मंदिर व पी-3 मधील श्री.हनुमान मंदिर समोरील खुली जागा विकसीत करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.29,98,872/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 27 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.65 मधील पोलीस चौकी ते सिडको बस स्थानक ते जालना रोड अक्षयदिप बिल्डींग या सर्व्हीस रोडचे डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन 2015-2016 नुसार रक्कम रूपये 49,70,800/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास दि.13/02/2018 अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर कामासाठी लागणारा खर्च मनपा अर्थसंकल्प 2017-2018 लेखाशिर्ष पुनर्डांबरीकरण (शहर) जीबीआर-वार्ड-07 पृष्ठ क्र.50, अ.क्र.01 रक्कम रू.1.00 कोटी तरतुद उपलब्ध आहे. करीता सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रूपये 49,70,800/- मंजुरीबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.65 मधील पोलीस चौकी ते सिडको बस स्थानक ते जालना रोड अक्षयदिप बिल्डींग या सर्व्हीस रोडचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.49,70,800/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 28 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.34 आरतीनगर मिसरवाडी येथे RCC संरक्षित भिंत बांधणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग/महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या विभागाच्या सन 2015-16 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.49,99,818/- चे तयार करण्यात आले असून या कामाचा खर्च मनपा अर्थसंकल्प सन 2017-18 मधील नाला ट्रेनींग या लेखाशिर्षामधुन प्रस्तावित आहे. सदर अंदाजपत्रकास दिनांक 16/03/2018 रोजी मान्यता दिलेली आहे.

तरी वार्ड क्र.34 आरतीनगर मिसरवाडी येथे आरसीसी संरक्षित भिंत बांधणे, या कामाचे रक्कम रूपये 49,99,818/- चे अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.34 आरतीनगर मिसरवाडी येथे RCC संरक्षित भिंत बांधणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.49,99,818/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 29 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.28 स्वामी विवेकानंदनगर अंतर्गत एन-12, डी सेक्टर मधील खुल्या जागेत सामाजिक सभागृह बांधणे व संरक्षित भिंतीची तुटलेल्या जागी दुरूस्ती कामे करणे बाबत या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.29,93,800/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदरील कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जिल्हा दरसुची 2015-16 नुसार तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च प्रस्तावित 2017-18 मधील व्यापारी संकुले व इतर इमारती या अंतर्गत करण्यात येणार आहे.

तरी सदरील कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.29,93,800/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.28 स्वामी विवेकानंदनगर अंतर्गत एन-12, डी सेक्टर मधील खुल्या जागेत सामाजिक सभागृह बांधणे व संरक्षित भिंतीची तुटलेल्या जागी दुरूस्ती कामे करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.29,93,800/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 30 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.113 आनंदनगर येथील गल्ली नं. 4 ते 7 मध्ये कॉंक्रीट रस्ता तयार करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन 2015-2016 नुसार रक्कम रू.44,12,252/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास दि.10/02/2018 अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर कामासाठी लागणारा खर्च मनपा अर्थसंकल्प 2017-2018 लेखाशिर्ष मा.महापौर यांनी सुचविलेल्या अत्यावश्यक कामे, रक्कम रू.50.00 लक्ष तरतुद उपलब्ध आहे. करीता सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रूपये 44,12,252/- मंजुरीबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.113 आनंदनगर येथील गल्ली नं. 4 ते 7 मध्ये कॉंक्रीट रस्ता तयार करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.44,12,252/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 31 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.09 मयुरनगर, सुदर्शननगर अंतर्गत राहूल प्रोव्हिजन ते श्री.मुंडलीक यांच्या घरापासून ते खर्चे वेल्डिंग वर्कशॉप पर्यंत सिमेंट काँक्रीट (ट्रिमिक्स) रस्ता तयार करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.39,99,200/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदरील कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जिल्हा दरसुची 2015-16 नुसार तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च प्रस्तावित 2017-18 मधील नविन काँक्रीट रस्ते शहरी भाग या अंतर्गत करण्यात येणार आहे.

तरी सदरील कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.39,99,200/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.09 मयुरनगर, सुदर्शननगर अंतर्गत राहूल प्रोव्हिजन ते श्री.मुंडलीक यांच्या घरापासून ते खर्चे वेल्डिंग वर्कशॉप पर्यंत सिमेंट काँक्रीट (ट्रिमिक्स) रस्ता तयार करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.39,99,200/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 32 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.72, क्रांतीचौक अंतर्गत गोपाल टी चौक ते उत्सव मंगल कार्यालय पर्यंतच्या रस्त्याचे काँक्रेटींग करणेच्या कामाचे अंदाजपत्रक राज्य दरसुची सन 2017-2018 नुसार रक्कम रू.49,68,350/- चे तयार करण्यात आलेले आहे. प्रस्तावित कामाचा खर्च महानगरपालिकेच्या सन 2017-18 च्या प्रस्तावित अर्थसंकल्पात शहरी भागात डांबरीकरण करणे, या लेखाशिर्षा अंतर्गत पान क्र.SCR-Ward-9 पान क्र.69 अ.क्र.02 वरील रक्कम रू.30.00 लक्ष तसेच प्रभाग क्र.72 येथे विविध विकास कामे करणे या लेखाशिर्षातंर्गत पान क्र.GBR-Ward-9 पान क्र.77 अ.क्र.01 वरील रक्कम रू.25.00 लक्ष या उपलब्ध तरतुदीमधुन करण्यात येणार आहे. अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करून मा.स्थायी समिती सभेत प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर करणेबाबत शिफारस आहे.

करीता, प्रस्तावित कामाच्या रक्कम रू.49,68,344/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.72, क्रांतीचौक अंतर्गत गोपाल टी चौक ते उत्सव मंगल कार्यालय पर्यंतच्या रस्त्याचे काँक्रेटींग करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.49,68,344/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 33 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.114 अंतर्गत छत्रपती क्रिडा संकुल येथे काँक्रीट रस्ता तयार करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2015-2016 दरसुची नुसार रक्कम रूपये 32,37,007/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास दिनांक 26/02/2018 अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

तसेच सदर कामासाठी लागणारा खर्च अर्थसंकल्प 2017-2018 मधील मा.सर्वसाधारण सभेने शिफारस केलेल्या कामा अंतर्गत पृष्ठ क्र.GBR-Ward-8 P.No.63 वरील नविन काँक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षकांतर्गत अ.क्र.30 तरतुद उपलब्ध आहे.

करीता सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रूपये 32,37,007/- मंजुरीबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.114 अंतर्गत छत्रपती क्रिडा संकुल येथे कॉंक्रीट रस्ता तयार करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रूपये 32,37,007/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 34 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.114 अंतर्गत राजेशनगर येथे कॉंक्रीट रस्ता तयार करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2015-2016 दरसुची नुसार र.रू.29,97,901/- चे तयार करण्यात आले आहे.सदर अंदाजपत्रकास दिनांक 26/02/2018अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

तसेच सदर कामासाठी लागणारा खर्च अर्थसंकल्प 2017-2018 मधील मा.सर्वसाधारण सभेने शिफारस केलेल्या कामा अंतर्गत पृष्ठ क्र.GBR-Ward-8 P.No.63 वरील नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षकांतर्गत अ.क्र.30 तरतुद उपलब्ध आहे.

करीता सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रूपये 29,97,901/- मंजुरीबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.114 अंतर्गत राजेशनगर येथे कॉंक्रीट रस्ता तयार करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.29,97,901/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 35 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.107 अंतर्ग प्राईड गॅलेक्सी ते अग्रेसन शाळेकडे जाणाऱ्या रस्त्याचे कॉंक्रीटींग करणेच्या कामाचे अंदाजपत्रक राज्य दरसुची (SSR) विभागाच्या सन 2017-18 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.49,99,426/- चे तयार करण्यात आलेले आहे. प्रस्तावित कामाचा खर्च मा.सर्वसाधारण सभेने सुचविलेली अत्यावश्यक कामे या लेखाशिर्ष मधून करण्यात येणार असून सदर अंदाजपत्रकास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

करीता प्रस्तावित कामाच्या रक्कम रू.49,99,426/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.107 अंतर्ग प्राईड गॅलेक्सी ते अग्रेसन शाळेकडे जाणाऱ्या रस्त्याचे कॉंक्रीटींग करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.49,99,426/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 36 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पंचकुवा कब्रस्तान वार्ड क्र.22 येथील नाल्यास आरसीसी रिटेनिंग वॉल बांधणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2015-2016 च्या दरसुचीनुसार रक्कम रूपये 41,45,830/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च सन 2017-2018 अर्थसंकल्पातील प्रो-पुअर बजेट या लेखाशिर्षका अंतर्गत उपलब्ध असलेल्या तरतुदीमधून करण्यात येईल.

तरी या कामाकरीता तयार करण्यात आलेले रक्कम रू.41,45,830/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पंचकुवा कब्रस्तान वार्ड क्र.22 येथील नाल्यास आरसीसी रिटेनिंग वॉल बांधणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रूपये 41,45,830/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 37 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.15 मिटमिटा अंतर्गत सलीम टी हाऊस ते सागर लॉन्स रस्त्याचे डांबरीकरण करणे, या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2015-16 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.24,97,522/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च सन 2016-17 च्या अर्थसंकल्पातील शहरी भागात पुनर्डांबरीकरण करणे या लेखाशिर्ष अंतर्गत उपलब्ध असून सदर काम श्री.एम.ए.सिद्दीकी, कंत्राटदार यांना 7.37% कमी दराने मिळालेले असून सदर कामासाठी अर्थसंकल्पात रक्कम रूपये 25.00 लक्षची तरतुद सन 2015-16 मध्ये करण्यात आली होती, त्या रक्कमेच्या मर्यादेत सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. परंतु सदर रक्कमेत सदर ठिकाणचा रस्ता पूर्ण होत नसल्यामुळे, सदर वार्डाचे स.नगरसेवक श्री.रावसाहेब आमले यांनी सदर ठिकाणचा रस्ता (सागर लॉन्स पर्यंत) पूर्ण करणेकरीता पत्र देऊन मागणी केलेली आहे. त्यानुसार सदर कामाचे सुधारीत अंदाजपत्रक र.रू.35,37,180/- चे तयार करण्यात आले आहे. सुधारीत अंदाजपत्रक र.रू.35,37,180/- चे वाढीव कामास मुळ ठेकेदार श्री.एम.ए.सिद्दीकी यांच्याकडून अ.प.दरापेक्षा 7.37% कमी दराने करण्याच्या मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय क्रमांक 37 मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.15 मिटमिटा अंतर्गत सलीम टी हाऊस ते सागर लॉन्स रस्त्याचे डांबरीकरण करणे, या वाढीव कामासाठी तयार करण्यांत आलेल्या सुधारीत र.रू.35,37,180/- चे अंदाजपत्रकास व वाढीव कामास मुळ ठेकेदार श्री.एम.ए.सिद्दीकी यांच्याकडून अ.प.दरापेक्षा 7.37% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 38 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट सातारा-देवळाई या भागात नागरी सोयी सुविधांचा विकास करण्यासाठी म्हणजेच सातारा-देवळाई या भागाचा (मौ.सातारा महसुली गावाचे गट क्र.120 ते 127 वगळून सर्व गट म्हणजेच गट क्र.199 व गट क्र.128 ते 356 व गावठाण तसेच मौ.देवळाई महसुली गावातील हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट असलेल्या भागातील मलनि:सारण व सांडपाणी व्यवस्थापन या नागरी सोयी सुविधांचा विचार करण्यासाठी शासन निर्णय क्र./संकीर्ण/2012/प्रक./24/नवी-16 दिनांक 27 जुन 2012 अन्वये सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे करीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांची नियुक्ती करणेकरीता या क्षेत्रातील तज्ञ तांत्रिक सल्लागार यांचेकडून ई निविदाद्वारे निविदा मागविण्यात आल्या त्यामध्ये सदर कामासाठी एकूण तीन निविदा धारकांनी (प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार) यांनी दर भरणा केले होते. या कामाची निविदा परिक्षणास्तव Bid Evaluation Committee स्थापन करण्यात आली होती. या समितीने प्रथम प्राप्त तीनही निविदा धारकाचे तांत्रिक प्रस्ताव तपासून त्याचे मुल्यांकन केले. सदरची स्पर्धा ही Quality Cost based system (70:30) या आधारावर करविण्यात आली. Bid Evaluation Committee च्या निर्णयानुसार सर्वात जास्त गुण प्राप्त M/s Yash innovation solution LLP Aurangabad यांचेकडून निविदेमध्ये नमूद दरानुसार म्हणजेच सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे (DPR) तयार करणे करीता एकुण प्रकल्प किमंतीच्या 0.36% या दराने व प्रकल्प व्यवस्थापन सेवा करीता एकुण प्रकल्प किमंतीच्या 0.62% दराने काम करून घेण्यास निवड समितीने म्हणजेच मा.आयुक्त, मा.शहर अभियंता, मा.मुख्यलेखा परिक्षक, मा.मुख्यलेखाधिकारी, मा.विधी सल्लागार, कार्यकारी अभियंता (ड्रेनेज) मा.स्थायी समितीकडे सादर करणेस्तव शिफारस केलेली आहे.

संदर्भ : टेंडर आयडी क्रमांक 2018-AMCA-309898-2

महाशय,

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता - (जलनि:सारण विभाग) |
| 2. | कामाचे स्वरुप/ कामाचे नांव | सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, शासनास मान्यतेस्तव सादर करणे, महाराष्ट्र शासनाकडून तांत्रिक व आर्थीक मंजुरी घेणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | नाही |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांच्या नियुक्ती करीता निविदा मागविण्यात आल्या आहेत. |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | ई निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या दैनिक दिव्य मराठी, पुण्यनगरी, दैनिक लोकमत, दैनिक सामना दिनांक 01/04/2018 |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | 07/05/2018 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 09/05/2018 |
| 6. | एकूण किती टेंडर्स आली? | 3 (तीन) |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | | पुर्वगणक पत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|---|
| | | सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे | प्रकल्प व्यवस्थापन सेवा | |
| 01. | यश इनोव्हेटीव सोल्युशन LLP औरंगाबाद | एकुण प्रकल्प किमंतीच्या 0.36% | एकुण प्रकल्प किमतीच्या 0.62% | |
| 02. | सिन्सीस टेक लि. (एडीसीसी, इन्फोकॅड लि.नागपुर) | एकूण प्रकल्प किमंतीच्या 0.58% | एकुण प्रकल्प किमतीच्या 1.64% | |
| 03. | फोट्रेस फायनांन्सीयल सर्व्हीसेस लि.मुंबई | एकूण प्रकल्प किमंतीच्या 3.45% | एकुण प्रकल्प किमतीच्या 3.45% | |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? असल्यास कारणे नमुद करावीत. | नाही.<br>नाही. |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | शासकीय निधी अंतर्गत 80% राज्य शासन, 20% मनपा हिस्सा. |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | शासकीय निधी अंतर्गत 80% राज्य शासन, 20% मनपा हिस्सा. |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | लागू नाही. |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषपत्राचा नमुना जोडला आहे काय? | नाही. |

तरी विषयाकिंत काम यश इनोव्हेटीव सोल्युशन LLP औरंगाबाद (प्रकल्प सल्लागार) सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याकरीता एकूण प्रकल्प किमंतीच्या 0.36% या दराने व प्रकल्प व्यवस्थापन सेवा करीता एकूण प्रकल्प किमंतीच्या 0.62% दराने काम करून घेण्यास व करार करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

श्री.गजानन बारवाल : लवकरात लवकर PMC नियुक्त्या करावी काम करावे.

मा.सभापती : कार्यवाही करावी विषय मंजूर करण्यांत येतो.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : गजानन नगर ओपन स्पेस आहे त्या संदर्भात त्या जागेला नाव लावण्या संदर्भात संचिका आतापर्यंत आलेली नाही.

मालमत्ता अधिकारी : गजानन नगरचा लेआऊट संदर्भात नगररचनाला पत्र दिले होते. त्याचा नकाशा सिटी सर्व्हे ऑफिसला लागणार आहे. त्यामुळे संचिका थांबली आहे.

मा.सभापती : ही बैठक संपल्यानंतर श्री. देशमुख श्री.कांबळे आणि श्रीमती थेटे मॅडम यांनी माझ्या दालनात यावे. यावर चर्चा करुन निर्णय घेता येईल.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट केलेल्या सातारा-देवळाई या भागात नागरी सोयी सुविधांचा विकास करण्यासाठी म्हणजेच सातारा-देवळाई या भागाचा (मौ.सातारा महसुली गावाचे गट क्र.120 ते 127 वगळून सर्व गट म्हणजेच गट क्र.199 व गट क्र.128 ते 356 व गावठाण तसेच मौ.देवळाई महसुली गावातील हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट असलेल्या भागातील मलनि:सारण व सांडपाणी व्यवस्थापन या नागरी सोयी सुविधांचा विचार करण्यासाठी शासन निर्णय क्र./संकीर्ण/2012/प्रक./24/नवी-16 दिनांक 27 जुन 2012 अन्वये सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे करीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांची नियुक्ती करणेकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक यश इनोव्हेटीव सोल्युशन LLP औरंगाबाद (प्रकल्प सल्लागार) यांची सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याकरीता एकूण प्रकल्प किमंतीच्या 0.36% या दराने व प्रकल्प व्यवस्थापन सेवा करीता एकूण प्रकल्प किमंतीच्या 0.62% दराने त्यांचेकडून काम करून घेण्यास व करार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी जाहीर केले.

**(दिलीप सुर्यवंशी)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद